# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 27.01.2022 वारः गुरुवार**

---

**देशाच्या अनेक भागांमध्ये कोरोनाची रुग्ण संख्या वाढत असल्यामुळे, आम्ही श्रोत्यांना आवाहन करत आहो की त्यांनी दक्ष राहावं आणि संपूर्ण लसीकरण करुन घ्यावं तसंच 15 ते 18 वर्षे वयाच्या मुलांसह इतरांना लस घेण्यात मदत करावी. कोरोना विषाणूच्या ओमीक्रॉन या नवीन प्रकारामुळं चिंता निर्माण झाली असल्यानं मुखपट्टी, सुरक्षित अंतर आणि हात तसंच चेहऱ्याची स्वच्छता या तीन सोप्या उपायांचं पालन करावं. कोविडसंबंधी कोणतीही माहिती आणि मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक 011-23 978 046 आणि 1075 या क्रमांकांवर संपर्क साधावा.**

---

1. 73वा प्रजासत्ताक दिन देशभरात उत्साहात साजरा; नवी दिल्लीतल्या राजपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक विविधतेचं मनोहारी दर्शन
2. बलशाली महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया-प्रजासत्ताकदिनी राज्यपालांचं आवाहन
3. मुंबई पोलीस दलाच्या निर्भया पथकाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण
4. पुण्यातील आशिष कासोदेकर या पन्नास वर्षीय धावपटूची अनोख्या विश्वविक्रमाला गवसणी आणि
5. राज्याच्या अनेक भागात आजही थंडीचा इशारा.

**<u>प्रजासत्ताक दिन</u>**

देशभरात काल 73 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नवी दिल्लीतल्या मुख्य समारंभात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी ध्वजवंदनानंतर राजपथावर झालेल्या शानदार संचलनाची मानवंदना स्वीकारली. भारताच्या लष्करी सामर्थ्याचं आणि सांस्कृतिक विविधतेचं मनोहारी दर्शन राजपथावरील संचलनातून झालं. यावेळी जम्मू काश्मीर पोलिस दलाचे सहाय्यक उपनिरीक्षक बाबू राम यांना मरणोत्तर अशोकचक्र प्रदान करण्यात आलं. 2020 मध्ये दहशतवाद्यांशी लढताना अतुलनीय शौर्य दाखवत बाबूराम यांनी 3 दहशतवाद्यांना ठार केलं होतं. राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांच्या कुटुंबियांनी हा पुरस्कार स्वीकारला. मुख्य सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.

यावर्षी संरक्षण मंत्रालयानं राजपथावरील संचलनासाठी काही नवीन कल्पना अमलात आणल्या. यात एरव्ही ज्यांना संचलन पाहणे शक्य होत नाही अशा लोकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

रिक्षा चालक, बांधकाम मजूर, स्वच्छता कर्मचारी आणि आघाडीवरच्या कोविड योद्ध्यांना संचलन सोहोळ्याचं विशेष निमंत्रण देण्यात आलं होतं.

राजपथावरील संचलनात सुरुवातीला लष्कराच्या सहा, नौदल आणि हवाई दलाच्या प्रत्येकी एक तसंच केंद्रिय सशस्त्र पोलिस दल, दिल्ली पोलिस, राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकांनी दिमाखदार संचलन केलं. लष्कराच्या दारुगोळा विभागाच्या पथकाचं नेतृत्व लेफ्टनंट मनिषा व्होरा या महिला अधिकाऱ्यानं केलं. सर्व पुरुष सदस्य असणाऱ्या पथकाचं नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्याच महिला अधिकारी ठरल्या.

सशस्त्र दलांच्या संचलनानंतर विविध राज्यं आणि मंत्रालयांच्या चित्ररथांनी राजपथावर सांस्कृतिक विविधता आणि विकासाचं दर्शन घडवलं. यात महाराष्ट्रातली जैवविविधता, कर्नाटकची पारंपरिक हस्तकला, गोव्याचं सास्कृतिक जीवन, पंजाबचं स्वातंत्र्यातील योगदान, उत्तर प्रदेशचं काशी विश्वनाथ धाम, हरियाणातील क्रीडाविश्व, जल जीवन मिशनमुळे बदललेलं ग्रामीण जीवन इत्यादींचा समावेश होता.अखेरीस हवाई दलाची 75 लढाऊ विमानं आणि हेलिकॉप्टर्सनी चित्तथरारक कसरती केल्या.

<u>प्रजासत्ताक दिन राज्य</u>

राज्यातही सर्वत्र प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिलेल्या बातम्यांवर आधारित हा वृत्तांत...

ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम मुंबईत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी मैदानावर झाला. प्रजासत्ताक दिनानिमित्त नवीन आणि बलशाली महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प आपण सगळे करूया असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं. या कार्यक्रमात गोवा पोलीस, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई पोलीस सशस्त्र दल, बृहन्मुंबई पोलीस वाद्यवृंद पथक तसंच बृहन्मुंबई अश्वदलानं राष्ट्रध्वजाला सलामी दिली. तत्पूर्वी राज्यपाल कोश्यारी यांनी राजभवनात राष्ट्रध्वज फडकवला आणि राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

विधान भवनात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ निलम गोऱ्हे यांच्या हस्ते आणि विधान सभेचे उपसभापती नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्ह्यांच्या संपर्कप्रमुखांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. शासकीय कार्यालयांमध्ये प्रमुख अधिकाऱ्यांच्या हस्ते तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुतेक ठिकाणी विशेष कामगिरी बजावलेले पोलिस अधिकारी-कर्मचारी, शासकीय अधिकारी कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिक, वीर पत्नी वीर माता, वैद्यकीय अधिकारी तसंच विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नागरिकांचा सन्मान करण्यात आला. काही ठिकाणी ध्वजारोहणानंतर राज्यघटनेच्या प्रस्तावनेचं सामुहिक वाचन करण्यात आलं.

पुण्यातल्या पोलिस परेड मैदानावर संपर्कमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर पवार यांच्या हस्ते फिरत्या पशुचिकित्सालयासाठी 10 वाहनांचं लोकार्पण करण्यात आलं.

हडपसरमधल्या ग्लायडिंग सेंटरमध्ये स्काय डायव्हिंग मधील आंतरराष्ट्रीय पॅराशुट जम्पर शीतल महाजन हिनं नऊ वारी साडी नेसून 6 हजार फूट उंच उड्डाण करत अनोख्या पद्धतीनं राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. अशा प्रकारे मानवंदना देणारी ती भारतातली पहिली स्काय डायव्हर ठरली आहे.

पालघर जिल्ह्यात डहाणू तालुक्याल्या चारोटी इथं प्रातिनिधिक स्वरूपात 9 तृतीयपंथीयांना संजय गांधी योजनेचा लाभ मंजूर करण्यात आल्याचं प्रमाणपत्र सहायक जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते देण्यात आलं. ठाणे जिल्ह्यात कोरोनामुळे दिवंगत झालेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नियुक्ती पत्राचं वाटप करण्यात आलं.

पंढरपूर इथं श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात प्रजासत्ताक दिनानिमित्त तिरंग्यातील तीन रंगांच्या फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

अकोला इथं साडेपाच हजार चौरस फुटांची भव्य रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीतून घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं व्यक्तीचित्र रेखाटण्यात आलं होतं. भंडारा जिल्ह्यात पावनी तालुक्यातल्या मांगली गावात दोनशे मीटर लांबीच्या तिरंग्यासह पदयात्रा काढली.

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर कालचा प्रजासत्ताक दिन साधेपणाने पण उत्साहात साजरा झाला. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमच्या वार्ताहरांसह मनोज क्षीरसागर पुणे.

**<u>प्रजासत्ताक दिन जग</u>**

जगभरात विविध देशांमधल्या भारतीय वकिलातींमध्येही काल प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. तसंच वकीलातींच्या इमारतींवर तिरंगी रोषणाई करण्यात आली होती. न्यूझीलंडमधल्या उच्चायुक्तांनी न्यूझीलंडमध्ये निर्यात याविषयीची पुस्तिका प्रकाशित केली. दक्षिण अफ्रिकेत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या उच्चायुक्त कार्यालयांमधल्या कर्मचाऱ्यांमध्ये क्रिकेटचा सामना रंगला.

**<u>अजित पवार</u>**

केंद्राकडून राज्यांना वस्तू आणि सेवा करापोटी मिळणारं अतिरिक्त उत्पन्न यावर्षीपासून बंद होणार असल्यानं राज्यांना उत्पन्नाचा नवा मार्ग शोधण्याची गरज असल्याचं उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात सांगितलं. राज्याच्या आगामी अर्थसंकल्पात करवाढ होण्याचे संकेत त्यांनी दिले. वस्तू आणि सेवा कर लागू झाल्यापासून पहिली 5 वर्षे केंद्राकडून राज्यांना भरपाईपोटी अतिरिक्त रक्कम मिळत होती; मात्र ती 5 वर्ष आता संपल्यानं ही रक्कम बंद होणार आहे, त्याचा परिणाम राज्याच्या तिजोरीवर होणार आहे. त्यातच कोरोना प्रादुर्भावामुळं उद्योगधंद्यावर विपरीत परिणाम झाला आहे, ही

परिस्थिती लक्षात घेता आणखी किमान 2 वर्षे केंद्राकडून राज्यांना अतिरिक्त निधी मिळावा, अशी मागणी केली जाणार असल्याचं पवार यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केलं. इतर मागासवर्गीय आरक्षणाशिवाय महापालिकेच्या निवडणुका घेण्यास आपला विरोध असल्याचं सांगून या आरक्षणाची व्यवस्था होईपर्यंत महापालिकांवर प्रशासकाची नियुक्ती व्हावी, अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.

**सेवा**

पुणे जिल्हा परिषदेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे 1 हजार 183 सेवा राज्य सार्वजनिक सेवा हक्क कायद्यातील तरतुदीनुसार अधिसूचित करण्यात आल्या असून कालच्या प्रजासत्ताक दिनापासून त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. अशा प्रकारे सर्व सेवा अथवा कामे अधिसूचित करणारी पुणे जिल्हा परिषद ही राज्यातील पहिलीच स्थानिक स्वराज्य संस्था ठरली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी याबद्दलची माहिती दिली.

**राज्य कोरोना**

राज्यात काल 35 हजार 756 नवीन कोरोनाबाधितांची नोंद झाली; तर 39 हजार 857 रुग्ण कोरोनामुक्त झाले. राज्यात आतापर्यंत 71 लाख 60 हजार 293 कोरोनाबाधित बरे झाले असून राज्यातील रुग्ण बरे होण्याचं प्रमाण 94 पूर्णांक 15 शतांश टक्के झालं आहे.

राज्यात काल या आजाराने 79 रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाली; सध्या राज्यातील मृत्युदर 1 पूर्णांक 87 शतांश टक्के आहे. राज्यात सध्या 2 लाख 98 हजार 733 रुग्ण उपचार घेत आहेत. राज्यात काल एकाही ओमीक्रॉनबाधितांची नोंद झाली नाही.

**मेळघाट शेतकरी सौरपंप**

डोंगरदऱ्यांमध्ये वीज पुरवठा करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता शासनाच्या वतीने मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आली. या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ आता मेळघाटातील शेतकऱ्यांना होताना दिसत आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

अमरावती जिल्ह्याच्या मेळघाटातील राहू, बिबा, पिपल्या, खारी, एकताई, भांडून, सलीता, चौबिता, जारीदा, चूरणी यासह दुर्गम भागातल्या शेकडो गावांचा अजूनही मुख्य व्यवसाय शेती असून तो पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर होतो. मेळघाटच्या अनेक गावांमध्ये मध्यप्रदेशातून वीजपुरवठा झाल्यानं अनेक गावं प्रकाशमान झाली मात्र शेती ही फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. शेतकऱ्यांनी आपल्या विहिरीवर डिझेल इंजिन बसवून पिकांना पाणी देण्यास सुरुवात केली होती. मात्र तासाला एक लिटर डिझेल हे गणित शेतकऱ्यांना परवडणारे नव्हते. त्यावर उपाय म्हणून महावितरणने शेतकऱ्यांसमोर सौर कृषी पंपाचा पर्याय ठेवला. हे सौर कृषी पंप शेतकऱ्यांना अल्पदरात उपलब्ध झाले. कधीकाळी फक्त सोयाबीन, मका, ज्वारी हे एकच पीक घेऊन वर्षभर ढगाकडे पाहणारे शेतकरी आता सौर कृषी पंपाच्या सहाय्याने त्याच शेतात विविध प्रकारच्या पालेभाज्या, गहू, धान, स्ट्रॉबेरी, बटाटा, मुसळी अशी विविध पिकं घेत आहेत. यामुळे डिझेल पंपावर होणारा खर्च शंभर टक्के कमी झाला असून विज बिलाचा तर प्रश्नच

उरला नाही. वीज पुरवठ्याची आशा धूसर झाली होती तिथेसुद्धा दिवसा शाश्वत वीजपुरवठा मिळत असल्यानं शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी अमरावतीहून जयंत सोनोने यांच्यासह मनोज क्षीरसागर, पुणे.

**निर्भया पथक**

मुंबई पोलिस दलानं निर्भया पथक आणि इतर उपक्रमांच्या माध्यमातून महिला सुरक्षिततेसाठी एक अतिशय महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. यामुळे महिला सुरक्षेच्या कामाला अधिक बळकटी मिळेल, असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. निर्भया पथकाचं तसंच इतर उपक्रमांचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या दूरस्थ उपस्थितीत झालं; त्यावेळी ते बोलत होते. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबई पोलिस आयुक्त हेमंत नगराळे यांच्यासह इतर मान्यवर याप्रसंगी प्रत्यक्ष उपस्थित होते. महाराष्ट्राची मातृभक्त, शक्तिपूजक आणि महिलांचं रक्षण करणारं राज्य अशी ओळख देशालाच नाही तर जगाला होईल अशा पद्धतीने आपण सर्वजण मिळून काम करूया, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

महाराष्ट्रातील प्रत्येक महिला भयमुक्त राहील यासाठी काम करण्याचं आवाहन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केलं. तर महिलांवरील अत्याचार थांबवणं तसंच तत्काळ प्रतिसाद देऊन महिलांना संरक्षण देण्यासाठी निर्भया पथकं काम करणार असल्याचं मुंबई पोलिस आयुक्त हेमंत नगराळे यांनी सांगितलं.

**महिला आयोग**

राज्य महिला आयोगाच्या सदस्यपदी सहा जणींची नियुक्ती करण्यात आली आहे. यात वकील गौरी छाब्रिया, वकील संगीता चव्हाण, सुप्रदा फातर्पेकर, दीपिका चव्हाण, आभा पांडे आणि उत्कर्षा रुपवते यांचा समावेश आहे. तीन वर्षांच्या कालावधीसाठी ही नियुक्ती करण्यात आली असून राज्य शासनानं नुकतीच याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

**इमारत दुर्घटना**

मुंबईत बांद्रा इथं काल एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत किमान नऊ जण जखमी झाले. त्यांना वी एन देसाई आणि बांद्रा भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचं समजतं. बेहराम नगर इथली पाच मजली इमारत काल दुपारी कोसळल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. अग्नीशामक दल आणि पोलिसांनी बचावकार्य केलं.

**निधन-नाशिक**

प्रख्यात शाहीर मेघराज बाफना यांचं काल नाशिक इथं अल्पशा आजारानं निधन झालं; ते 84 वर्षांचे होते. बाफना यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याचं काम केलं होतं. लोककलेच्या क्षेत्रातील योगदानासाठी त्यांचा राज्य शासनातर्फे गौरव करण्यात आला होता.

**विक्रम**

देशभरात प्रजासत्ताक दिन साजरा होत असताना पुण्यातील आशिष कासोदेकर या पन्नास वर्षीय धावपटूने काल एका अनोख्या विश्वविक्रमाला गवसणी घातली. सलग 60 दिवस 42 किलोमीटरहून अधिक अंतर धावत त्यांनी इटलीमधील एंझो कॅपेरासो याचा 59 दिवसांचा विक्रम मागे टाकला. आशिष यांनी केंद्र सरकारच्या फिट इंडिया चळवळीच्या माध्यमातून गेल्या वर्षी 28 नोव्हेंबरपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये मॅरेथॉन धावण्याला प्रारंभ केला. त्यांचा हा विश्वविक्रम पूर्ण झाल्यानंतर कुलगुरु डॉक्टर नितीन करमळकर यांच्या हस्ते काल त्यांचा सत्कार करण्यात आला.

**थंडी-धुळे**

उत्तर भारतातल्या थंडीच्या लाटेचा परिणाम राज्यातही जाणवत आहे. यंदाच्या हिवाळयात धुळे शहरात काल पहिल्यांदाच तापमानात विक्रमी घट झाली. थंडीचा कडाका आणखी काही दिवस कायम राहण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, ऊबदार कपड्यांचा वापर करावा, विशेषतः लहान मुलं, ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**हवामान**

राज्याच्या विविध भागांमध्ये थंडीचा कडाका चांगलाच जाणवतो आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये 10 अंशांपेक्षा कमी किमान तापमानाची काल नोंद झाली. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आजही थंडीचा कडाका राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**